# बृहन्मुंबई महानगरपालिका

## दुकाने व आस्थापना विभाग

मुंबई महापालिका अधिनियम, 1888 च्या सुधारित कलम 64 अ(1) मधील तरतूदीनुसार बृहन्मुंबई महापालिकेमार्फत पुरविण्यात येणा-या नागरी सेवा/ सुविधांबाबतची नागरिकांची सनद पुढीलप्रमाणे प्रसिध्द करीत आहे.

**नागरिकांची सनद**

| | | |
|---|---|---|
| 1 | विषय | अ) महाराष्ट्र दुकाने व आस्थापना (नोकरीचे व सेवाशर्तीचे विनियमन) अधिनियम 2017 च्या कलम 1 (3) नुसार या अधिनियमाच्या सर्व तरतूदी 10 किंवा 10 पेक्षा जास्त कामगार संख्या असलेल्या आस्थापनांना लागू आहे.<br>अ-1) नोंदणीकरण, नुतनीकरण व नोंदणी प्रमाणपत्रातील बदल व इतर सर्व तरतूदी 10 किंवा 10 पेक्षा जास्त कामगार संख्या असलेल्या आस्थापनांना लागू आहे. आस्थापनेचे नोंदणीकरण करण्यासाठी आस्थापना सुरु झाल्यापासून 60 दिवसांच्या आत नोंदणीप्रमणपत्रासाठी 'अ' नमुन्यात अर्ज करणे आवश्यक आहे.<br>ब) महाराष्ट्र दुकाने व आस्थापना (नोकरीचे व सेवाशर्तीचे विनियमन) अधिनियम 2017 च्या कलम 1(3) नुसार सदर अधिनियमाच्या कलम 7 खेरीज कोणतीही तरतूद 0 ते 9 कामगार संख्या असलेल्या आस्थापनांना लागू नाही.<br>ब-1) 0 ते 9 कामगार संख्या असलेले आस्थापनांनी, आस्थापना सुरु झाल्यापासून 60 दिवसांच्या आत सुचनापत्र देणे गरजेचे आहे. सदर सुचना विहित नमुन्यात देणे आवश्यक आहे. |
| 2 | आवश्यक कागदपत्रे | अ)0 ते 9 कर्मचारी असलेल्या आस्थापनांकरिता सुचनापत्राचा अर्ज नमुना 'क' मध्ये करावा.<br>10 किंवा 10 पेक्षा जास्त कामगार असलेल्या आस्थापनाच्या नोंदणीसाठी अर्ज प्रपत्र 'अ' मध्ये करावा.<br>ब) 0 ते 9 कामगार असलेल्या आस्थापना व 10 किंवा 10 पेक्षा जास्त कामगार असलेल्या आस्थापनांना अर्ज करतेवेळी सादर करावयाची सदर कागपत्रे खालील प्रमाणे आहेत.<br>i)आधार कार्ड असल्यास<br>ii)आस्थापना भागीदारी संस्था असेल तर भागीवारीचा करार.<br>iii)आस्थापना संस्था निगम असल्यास -<br>a)संस्थेचे निगमन विष्यक प्रमाणपत्र (Certificate of Incorporation) |

<table>
<tr><td></td><td></td><td>b) सक्षम अधिका-यांच्या स्वाक्षरीसह संचालकाची नावे व घरचे पत्ते याची यादी.</td></tr>
<tr><td>3</td><td>अंतिम निर्णयासाठी लागणारा कालावधी</td><td><u>1)आस्थापनेच्या नवीन नोंदणीकरिता ऑनलाईन अर्ज (प्रपत्र-</u><u>अ</u>)-तात्काळ<br><u>2)नोंदणी प्रमाणपत्राचे नुतनीकरणकरिता ऑनलाईन अर्ज</u><br>(प्रपत्र-ड)- अर्ज प्राप्त होताच त्वरित वितरण.<br><u>3)नोंदणीप्रमाणपत्रामधील बदलासंबंधी ऑनलाईन अर्ज(प्रपत्र-आय)-</u><br>नोंदणीप्रमाणपत्रातील बदलाकरिता आपणांस ऑनलाईन 'प्रपत्र आय' नमुन्यात संबंधित कागदपत्रासह अर्ज करणे आवश्यक आहे. अर्जदाराने 'प्रपत्र आय' सहित कागदपत्रे स्कॅन करुन अपलोड करणे आवश्यक आहे. अर्ज मंजूरी नंतर नोंदणीप्रमाणपत्र नियोक्ताचा ई- मेल आयडी वर कार्यालयीन कामकाजाच्या 7 दिवसात प्राप्त होईल. अर्जदाराने अपूर्ण कागदपत्र अपलोड केले असल्यास, अर्ज 'आय प्रपत्र' (बदलाचे प्रपत्र) ना मंजूर करण्यात येईल व त्या बाबत नियोक्त्याचा ई-मेल आयडी वर कारणासहित कळविण्यात येईल.</td></tr>
<tr><td>4</td><td>माहिती मिळण्याचे ठिकाण</td><td>संपूर्ण माहिती मनपाच्या संकेतस्थळ <u>www.mcgm.gov.in</u> वर उपलब्ध आहे.</td></tr>
<tr><td>5</td><td>मुंबई महानगरपालिका अधिनियम 1888 च्या ज्या कलमांच्या आधारे काम करणे आहे ते कलम</td><td>महाराष्ट्र दुकाने व आस्थापना (नोकरीचे व सेवाशर्तीचे विनियमन) अधिनियम 2017 अन्वये कामकाज चालते.</td></tr>
<tr><td>6</td><td>महापालिका ठराव, परिपत्रक, आदेश इत्यादी.</td><td>महाराष्ट्र दुकाने व आस्थापना (नोकरीचे व सेवाशर्तीचे विनियमन) अधिनियम 2017<br>क्र.सीआय/5107/एसईसी, दि.26.12.2016<br>क्र.सीआय/4745/एसई, दि.17.01.2018<br>सुधारित परिपत्रक क्र.सीआय/6230/एसई, दि.16.04.2018</td></tr>
<tr><td>7</td><td>निर्णय घेणारे अधिकारी</td><td>नोंदणीप्रमाणपत्रातील बदल करिता 'आय' नमून्यातील प्रपत्रात ऑनलाईन अर्ज करणे. या करिता
<table>
<tr><th>स्तर</th><th>पदनाम निर्णयासाठी</th><th>लागणारा कालावधी</th></tr>
<tr><td>पहिला स्तर</td><td>सुविधाकार(दु.व आ.)</td><td>त्रुटी विरहित कागदपत्रे असतील तर 7 दिवस</td></tr>
<tr><td>दुसरा स्तर</td><td>वरिष्ठ सुविधाकार (दु.व आ.)</td><td>त्रुटी विरहित कागदपत्रे असतील तर 3 दिवस</td></tr>
<tr><td>तिसरा स्तर</td><td>-</td><td>-</td></tr>
</table></td></tr>
<tr><td></td><td></td><td>आदेश/प्रमाणपत्र/परवाना देण्यास सक्षम अधिकारी — वरिष्ठ सुविधाकार दुकाने व आस्थापना</td></tr>
</table>

| | | |
|---|---|---|
| 8 | आवश्यक फी व त्याचे परिपत्रक /नियम | निशुल्क:<br>सुधारित परिपत्रक क्र.सीआय/6230/एसई, दि.16.04.2018 |
| 9 | फी भरण्याची पध्दत | ---- |
| 10 | अंतिम विहित कालावधीमध्ये निर्णय न घेतला गेल्यास ज्यांना जबाबदार धरावयाचे त्यांचे नांव व पदनाम | प्रणालीतून ऑनलाईन सेवा तात्काळ देण्यात येत असल्याने प्रश्न उदभवत नाही. तथापी नोंदणीप्रमाणपत्रातील बदलाकरिता संबंधित विभागातील सुविधाकार व वरिष्ठ सुविधाकार जबाबदार असतील. |
| 11 | सेवा विहित कालावधीत पुरविली न गेल्यास ज्यांच्याकडे तक्रार करता येईल,तो अधिकारी व त्याचा दूरध्वनी क्रमांक,ई-मेल | श्रीम. सुनिता सदाशिव जोशी ,<br>प्रमुख सुविधाकार (दुकाने व आस्थापना)<br>24311751 – कार्यालयीन<br>24224901 - वैयक्तीक<br>मो.-9920089179 |

प्रमुख सुविधाकार<br>दुकाने व आस्थापना

उप आयुक्त (विशेष)

अति.आयुक्त (शहर)